# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

**सभा क्र.:- ०९ // विशेष महासभा बैठकीचे कार्यवृत्त // दि.०५/०३/२०१९**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.०५/०३/२०१९ मंगळवार रोजी दुपारी ०१.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर, सौ.सिमा सुरेश भोळे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्ट्रमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा. सौ.सिमा सुरेश भोळे, महापौर, तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| **सोनवणे अश्विन शांताराम मा.उपमहापौर** | कापसे मयुर चंद्रकांत | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| जोहरे प्रिया मधुकर | कापसे प्रतिभा चंद्रकांत | सोनार रंजना विजय |
| नेरकर सरिता अनंत | देशमुख प्रतिभा गजानन | खडके सुनिल वामनराव |
| पोकळे दिलीप बबनराव | पाटील विजय पुडलिक | खडके विश्वनाथ सुरेश |
| खान रुकसानाबी गबलु | सोनवणे सुरेश माणिक | भंगाळे विष्णु रामदास |
| सोनवणे कांचन विकास | बारी शोभा दिनकर | सोनवणे राखी शामकांत |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | शेख हसीनाबी शरीफ | लढढा नितीन बालमुकुंद |
| सपकाळे मिना धुडकु | पाटील कुलभुषण विरभान | जोशी अनंत हरिश्चंद्र |
| सपकाळे रंजना भरत | भिल पार्वताबाई दामु | महाजन सुनिल सुपडू |
| सनकत चेतन गणेश | पाटील उषा संतोष | नाईक प्रशांत सुरेश |
| सोनवणे भारती कैलास | कोल्हे सिंधु विजय | पटेल इब्राहिम मुसा |
| चौधरी चेतना किशोर | बेंडाळे उज्वला मोहन | सोनवणे लताबाई चंद्रकांत |
| सोनवणे मुकुंदा भागवत | राणे गायत्री इंद्रजित | सोनवणे विक्रम किसन |
| काळे अमित पांडुरंग | तायडे सुरेखा नितीन | भापसे जिजाबाई आण्णासाहेब |
| चौधरी मंगला संजय | चव्हाण ज्योती बाळासाहेब | देशमुख सुन्नाबी राजु |
| अड.हाडा शुचिता अतुलसिंह | मराठे जितेंद्र भगवान | शेख सैईदा युसुफ |
| सोनवणे धिरज मुरलीधर | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | **स्विकृत सदस्य** |
| काळे दिपमाला मनोज | पाटील रेखा चुडामण | सोनवणे कैलास नारायण |
| पाटील सचिन भिमराव | पाटील राजेंद्र झिपरु | त्रिपाठी विशाल राधेशाम |
| पाटील प्रतिभा सुधीर | काळे रेश्मा कुंदन | मराठे राजेंद्र नारायण |
| पाटील चंद्रशेखर शिवाजी | आहुजा मनोज नारायणदास | चौधरी महेश रतन |

सदर सभेस मा.उपायुक्त,श्री.चंद्रकांत खोसे, श्री.लक्ष्मीकांत कहार, नगरसचिव श्री.सुनिल गोराणे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरु करण्याचे निर्देश दिले.

नगरसचिव :- सर्व सन्मा.सदस्यांचे हार्दिक स्वागत करतो.

**(वंदेमातरम ने सभेची सुरुवात झाली.)**

नगरसचिव :- आजच्या सभेकरिता सन्मा.सदस्य, सौ.जयश्री सुनिल महाजन, सौ.शबानाबी सादीक खाटीक, श्रीमती लताताई रणजीत भोईटे, श्री.भगत रावलमल बालाणी, श्री.सदाशिव गणपतराव ढेकळे, श्री.किशोर रमेश बाविस्कर,श्री.ललित विजयराव कोल्हे, श्री.प्रवीण रामदास कोल्हे, श्री.बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम यांचे रजेचे अर्ज आलेले आहेत ते मा.पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेले आहेत.

**सन्मा.सदस्यांनी मांडलेल्या श्रध्दांजली प्रस्तावाचे अनुषंगाने सभागृहाने ठराव क्र.११३ अन्वये खालील नमूद केलेप्रमाणे ठराव पारित केला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दाजंलीचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १ | सौ.सिमा सुरेश भोळे, महापौर | महानगरपालिका अभियंता श्री.सुनिल पंडीत भोळे यांचे वडील रिटायर्ड आरोग्य पर्यवेक्षक स्व.पंडीतराव अंकात भोळे, गणेश कॉलनी परिसरातील स्व.गिरीष मोरदे यांचे दुखःद निधनाबद्दल. |
| २ | डॉ.श्री.अश्विन शांताराम सोनवणे उपमहापौर | गणेश कॉलनी परिसरातील स्व.गिरीष मोरदे यांचे दुखःद निधनाबद्दल. |
| ३ | श्री.विष्णु रामदास भंगाळे | महानगरपालिका अभियंता श्री.सुनिल पंडीत भोळे यांचे वडील रिटायर्ड आरोग्य पर्यवेक्षक स्व.पंडीतराव अंकात भोळे, पिंप्राळा येथिल रहिवासी कै.आर.ए.पाटील, क्रिडासहाय्यक अधिकारी उ.म.वि.जळगांव यांचे दुखःद निधनाबद्दल. |
| ४ | श्री.ललित विजयराव कोल्हे | महानगरपालिका अभियंता श्री.सुनिल पंडीत भोळे यांचे वडील रिटायर्ड आरोग्य पर्यवेक्षक स्व.पंडीतराव अंकात भोळे यांचे दुखःद निधनाबद्दल. |
| ५ | सौ. गायत्री इंद्रजित राणे<br>सौ.सुरेखा नितीन तायडे | पुलवामा मध्ये सेंट्रल रिर्झव्ह पोलिस फोर्सचे ४५ भारतीय जवान शहीद झाले त्यातील नाशिक येथिल स्व.विनाद मांडव गणे विरगतीस प्राप्त झालेबद्दल. |
| ६ | प्रा.श्री.सचिन भिमराव पाटील | शिवकॉलनी येथिल रहिवासी कै.मधुकर यशवंत पाटील, कै.गुरुदत्त चंपालाल धाकड, कै.योगेद्रसिंग प्रल्हाद सोनवणे, तसेच विजय कॉलनीतील रहिवासी कै.गिरीष अनंत मोरदे यांचे दुखःद निधनाबद्दल. |
| ७ | सौ.मंगला संजय चौधरी | जळगांव शहरातील स्व.सिताराम तुकाराम चौधरी तसेच स्व.अनिता अवधूत चौधरी यांचे दुखःद निधनाबद्दल. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दुःखद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दुःख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दुःखात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दुःख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

**सन्मा.सदस्यांनी मांडलेल्या अभिनंदन प्रस्तावाचे अनुषंगाने सभागृहाने ठराव क्र.११४ अन्वये खालील नमूद केलेप्रमाणे ठराव पारित केला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | अभिनंदनाचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १ | सौ.सिमा सुरेश भोळे, महापौर | १) नुकताच पुलवामा मध्ये झालेल्या भ्याड हल्ल्याच्या विरोधात भारतीय वायुसेनेने पाकिस्तानातील आतंकवादी संघटनांचे तळ उध्वस्त करुन सुमारे २५० आंतकवादींना कंठस्थान केलेले असुन पाक वायुसेनेच्या विमानांनी भारतीय हद्दीत घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला असता, भारतीय वायुसेनेचे विर पायलट विंगकमांडर श्री.अभिनंदन वर्धमान याने पाकिस्तानचे एक विमान पाडून तसेच त्यांचे विमान शतीग्रस्त झाल्यामुळे पॅराशूट व्दारे पाकिस्तानी हद्दीत पडून कैद झालेले होते. तरी आंतरराष्ट्रीय दबावाव्दारे भारतीय वायुसेनेचे विंगकमांडर श्री.अभिनंदन वर्धमान यांना पाकिस्तानने पुन्हा भारत सरकारकडे सोपविले असुन श्री.अभिनंदन वर्धमान यांनी केलेल्या पराक्रमी, उल्लेखनिय कामगिरी केल्याबद्दल त्यांचे जळगांव शहर महानगरपालिकेतर्फे हार्दीक अभिनंदन. |

| | | |
|---|---|---|
| | | २) सन्मा.सदस्य श्री.विष्णू रामदास भंगाळे यांची महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळा अंतर्गत जिल्हा पर्यावरण समितीमध्ये अशासकिय सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| २ | डॉ.श्री.अश्विन शांताराम सोनवणे, उपमहापौर | सन्मा.सदस्य श्री.विष्णू रामदास भंगाळे यांची महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळा अंतर्गत जिल्हा पर्यावरण समितीमध्ये अशासकिय सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| ३ | राणे गायत्री इंद्रजित<br>तायडे सुरेखा नितीन<br>दारकुंडे नवनाथ विश्वनाथ<br>नेरकर अनंत सरीता | नुकताच पुलवामा मध्ये झालेल्या भ्याड हल्ल्याच्या विरोधात भारतीय वायुसेनेने पाकिस्तानातील आतंकवादी संघटनांचे तळ उध्वस्त करुन सुमारे २५० आंतकवादींना कंठस्थान केलेले असुन पाक वायुसेनेच्या विमानांनी भारतीय हद्दीत घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला असता, भारतीय वायुसेनेचे विर पायलट विंगकमांडर श्री.अभिनंदन वर्धमान याने पाकिस्तानचे एक विमान पाडून तसेच त्यांचे विमान शतीग्रस्त झाल्यामुळे पॅराशूट व्दारे पाकिस्तानी हद्दीत पडून कैद झालेले होते. तरी आंतरराष्ट्रीय दबावाव्दारे भारतीय वायुसेनेचे विंगकमांडर श्री.अभिनंदन वर्धमान यांना पाकिस्तानने पुन्हा भारत सरकारकडे सोपविले असुन श्री.अभिनंदन वर्धमान यांनी केलेल्या पराक्रमी, उल्लेखनिय कामगिरी केल्याबद्दल त्यांचे जळगांव शहर महानगरपालिकेतर्फे हार्दीक अभिनंदन. |
| ४ | तायडे सुरेखा नितीन | जळगांव शहरातील श्री.अशोक बाबुराव गायकवाड यांचे सुपूत्र चि.पियुष यांनी भारतीय प्रशासन सेवा अंतर्गत नुकत्याच संपन्न झालेल्या स्पर्धा परिक्षा उर्तीण करुन जळगांव शहराचे नावलौकीक केलेले असून त्यांनी केलेल्या उल्लेखनियम कामगिरी केल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| ५ | हाडा शुचिता अतुलसिंह | १) भा.ज.पा. प्रणीत आदिवासी मोर्चाच्या जळगांव महानगराध्यक्षपदी सन्मा.सदस्या, सौ.पार्वताबाई भिल यांची निवड झालेबद्दल (२) खान्देशात लघुपट, माहितीपट, आणि चित्रपटाच्या क्षेत्रात उत्कृष्ठ कार्य केल्याबद्दल दिग्दर्शक, कलावंत श्री.सुनिल भटकर यांना जळगांवात पार पडलेल्या आशियाई चित्रपट महोत्सवात सन्मानित केल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. (३) भारतीय वायुसेनेचे विंग कमांडर श्री.अभिनंदन वर्धमान यांना विना अटी शर्तीत भारतास परत पाठविले हा परराष्ट्र धोरणाचा विजय आहे त्यामुळे परराष्ट्रीय मंत्री श्रीमती सुषमा स्वराज व राष्ट्रीय सुरक्षा एजन्सीचे प्रमुख श्री.अजीत डोभाल तसेच मा.पंतप्रधानमंत्री श्री.नरेंद्र मोदी यांचे हार्दीक अभिनंदन. |
| ६ | खडके सुनिल वामनराव<br>सनकत चेतन गणेश | १) देशाचे माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्रजी मोदी साहेब यांनी कुंभमेळयामध्ये सफाई कर्मचाऱ्यांचे चरण धुतले, देशाच्या इतिहासात प्रथमच ही गोष्ट झालेली आहे. समाजातील तळागाळातील व्यक्ती घटकांचा पंतप्रधानांनी केलेला हा सन्मान सर्वांना सुखावह असाच आहे. याबाबत माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्रजी मोदी यांचे हार्दीक आभार. (२) भारतीय वायुसेनेचे विंग कमांडर श्री.अभिनंदन वर्धमान यांना विना अटी शर्तीत भारतात परत पाठविले हा परराष्ट्र धोरणाचा विजय आहे त्यामुळे परराष्ट्रीय मंत्री श्रीमती सुषमा स्वराज व |

| | | |
|---|---|---|
| | | राष्ट्रीय सुरक्षा एजन्सीचे प्रमुख श्री.अजीत डोभाल तसेच मा.पंतप्रधानमंत्री श्री.नरेंद्र मोदी यांचे हार्दीक अभिनंदन. |
| ७ | नाईक प्रशांत सुरेश | सन्मा.सदस्य श्री.कैलास नारायण सोनवणे व सन्मा.सदस्या सौ.भारती कैलास सोनवणे यांचे लग्नाच्या वाढदिवसा निमित्त हार्दीक अभिनंदन. |
| ८ | जिल्हाध्यक्ष, अखिल भारतीय सफाई मजदूर संघ | देशाचे माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्रजी मोदी साहेब यांनी कुंभमेळयामध्ये सफाई कर्मचाऱ्यांचे चरण धुतले, देशाच्या इतिहासात प्रथमच ही गोष्ट झालेली आहे. समाजातील तळागाळातील व्यक्ती घटकांचा पंतप्रधानांनी केलेला हा सन्मान सर्वांना सुखावह असाच आहे. याबाबत माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्रजी मोदी यांचे जळगांव शहरातील सर्व सफाई कर्मचारी व मेहतर समाजातर्फे हार्दीक आभार. |

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने मान्यवरांची झालेली निवड, त्यांनी विविध सामाजिक कार्य, क्रिडा क्षेत्रात मिळविलेले पुरस्कार, सुयश व अभिष्टचिंतनाबद्दल हे सभागृह उपरोक्त सर्वांचे अभिनंदन करीत असुन उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आहे.

श्री.कैलास सोनवणे :- **राजकीय मंडळींचा निषेधाचा ठराव या ठिकाणी मांडत आहे. १४ तारखेला जो CRPF च्या जवानांवर** पुलवामा येथे झालेल्या अतिरेकी हल्ल्यात on the spot जवान मारले गेले त्यानंतर संपुर्ण देशामध्ये श्रध्दांजली वाहीली गेली. काही ठिकाणी या घटनेचा निषेध ही केला गेला. त्यानंतर युध्दाची सुध्दा काही ठिकाणी मागणी करण्यात आली. शहीद झालेल्या जवानांचे प्रती २६ तारीखेस भारतीय सेनेने पाकीस्तानातील अतिरेक्यांच्या प्रशिक्षण स्थळांवर हवाई हल्ला केला या हल्ल्यात ३०० अतिरेकी ठार झाले. याचा पुरावा म्हणजे त्यादिवशी त्याठिकाणी ३०० मोबाईलांचे नेटवर्क चालु होते आणि काही नेत्यांनी शंकाही उपस्थित केल्या. आपल्या देशातील काही व्यक्तींनी सदर कारवाईत फक्त झाडे-झुडपे पाडली गेली असे वक्तव्य केली आहेत. तसेच या हल्ल्या संदर्भात काही राजकीय नेत्यांनी शंका उपस्थित केल्या. खरेतर अशावेळेस आपण देशाचे मागे उभे राहीले पाहीजे. म्हणून या लोकांनी जे असे वक्तव्य केले आहे त्या लोकांचे निषेधार्थ मी ठराव मांडतो. भारताने केलेल्या हवाई हल्ल्यानंतर पाकिस्ताने केलेल्या प्रती हवाई हल्ला केला त्यावेळेस पाकीस्तानचे विमान भारतीय हवाई सेनेने पाडले व सदर विमानातील विंग कंमाडर जे पाकीस्तानी होते ते पाकीस्तान हद्दीत पडले होते परंतू पाकीस्तानी नागरीकांनी त्यांना बेदम मारहाण केली म्हणजे याठिकाणी सुध्दा देवाने सत्याची साथ दिली. तसेच सदर कारवाई करताना आपले एक विमान पाकीस्तानने पाडले त्यातील विंग कंमाडर अभिनंद वर्धमान हे पाकीस्तानी हद्दीत पडले होते त्यांना पाकीस्तान सरकाने आपल्या ताब्यात घेतले होते परंतू आपल्या भारत सरकारचे परराष्ट्र धोरणामुळे पाकीस्तानने विंग कंमाडर अभिनंद वर्धमान यांना विनाअट भारतास सोपविले. आपल्या सरकारचे परराष्ट्र धोरण व निती मुळे हे शक्य झाले आहे. म्हणुन मी आपल्या सरकारचे अभिनंदन करतो, तसेच भारतीय सैनिकांचे अभिनंदन करतो आणि अशा परिस्थितीत जे लोकं वेगवेगळे वक्तव्य करत आहेत. त्यांच्या डोक्यात किडे पडलेले आहेत. अश्या सर्व राजकीय मंडळींचा निषेध करतो. शेवटी मला अटलजींचे एक वाक्य आठवते. ये सरकार रहे ना रहे ये देश रहना चाहिए ये देश का लोकतंत्र रहेना चाहिए कारण शेवटी आपला देश महत्वाचा आहे.

श्री.सुनिल महाजन :- सन्मा.सदस्य श्री.कैलास आप्पा सोनवणे यांनी जो ठराव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

नगरसचिव विषय क्र.१) **जळगांव शहर महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ चे सुधारीत अंदाज पत्रकासह सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकास स्थायी समितीने ठराव क्र.९० दिनांक २६/०२/२०१९ अन्वये मान्यता प्रदान केलेली असुन महासभेच्या मान्यतेसाठी आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.**

* म.स्थायी समिती सभापती यांनी मा.महापौर यांना अंदाजपत्रकाची प्रत दिली.

**श्री.जितेंद्र मराठे** :- जळगाव शहर महानगरपालिकेचे सन 2018- 19 या वित्तीय वर्षासाठीचे सुधारित अंदाजपत्रक व सन 2019-20 या वित्तीय वर्षासाठी मुळ अंदाजपत्रक स्थायी समितीच्या वतीने स्थायी समिती सभापती म्हणून सादर करतांना मला विशेष आनंद होत आहे.

महानगरपालिकेच्या सदस्यपदी पहिल्यांदा नियुक्ती होत असतांना मला सभापती, स्थायी समिती ह्या आर्थीक महत्वाच्या पदावर नियुक्ती मिळाली व पहिल्याच वर्षाचे जळगाव महानगरपालिकेचे अंदाजपत्रक सादर करण्याची संधी मिळाली हे मी माझे भाग्यच समजतो.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 95 च्या तरतूदीस अधिन राहून महासभेचे अंदाजपत्रक तयार करणेसाठी जळगाव शहर महानगरपालिकेचे आयुक्त श्री. चंद्रकांत कृष्णराव डांगे (भा.प्र.से.) यांनी महानगरपालिकेच्या अपेक्षित उत्पन्नासह खर्चाचा तपशील दि.20/02/2019 रोजीच्या स्थायी समिती समोर मनोगतासह आवश्यक माहिती व आकडेवारी सादर केली आहे. विशेष बाब विचारात घेऊन कोणतीही करवाढ

सूचविण्यात आलेली नाही. सन 2019-20 चा अर्थसंकल्प 230.90 कोटी रुपये आरंभीच्या शिल्लकीसह सुरुवात आहे. त्यामुळे शिल्लक 230.90 कोटी रुपये महानगरपालिकेस उत्पन्न रु.280.27 कोटी व अनुदाने रु. 114.05 कोटी असा एकूण 625.24 कोटी रुपये इतका आहे व महानगरपालिका निधी रु.65.47 कोटी व शासकीय निधी रु.426.74 कोटी मिळुन एकूण अंदाजपत्रक रु.1117.46 कोटी इतके प्रस्तावित केले आहे. मात्र जळगाव शहरवासियांना किमान नागरी सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी अपूर्ण तरतूदी केल्या आहेत. हुडको व जे.डी.सी.सी. कर्ज प्रकरण व गाळे प्रश्न प्रलंबित असल्याने प्रत्यक्ष उत्पन्नात खर्च भागविणे जिकरीचे असल्याने नागरीकांना सुविधा देवू शकत नसल्याचे आयुक्तांनी त्यांचे मनोगतामध्ये व्यक्त केले आहे.

जळगाव वासियांना सेवासुविधा देणेकामी तसेच यासाठी महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. उत्पन्नात वाढ करणेचे दृष्टीने काही प्रभावी उपाययोजना राबविण्याची आवश्यकता आहे. खुला भुखंड कर वसुली वाढविणे, दुकानांसमोरील अनधिकृत बॅनर, पोस्टर यावर दंड आकारणी करुन उत्पन्नात वाढ करणे, अनधिकृत नळ संयोजने शोधून अधिकृत करणे, मालमत्ता करामध्ये कोणतीही वाढ न करता नवीन मालमत्ताधारकांचा शोध घेवून मालमत्ता उत्पन्नामध्ये वाढ करणे अशा अनेक प्रकारे वसुली वाढविणे आवश्यक आहे. यासाठी मा. आयुक्त सो., यांनी त्यांचे अंदाजपत्रकीय निवेदनात प्रस्तावित केलेल्या अंदाजपत्रकीय तरतुदीस जमा व खर्च या शिर्षास खाली नमूद केलेप्रमाणे दुरुस्त्या सुचविण्यात येत आहे.

1) अर्थ संकल्पीय जमा बाजू -

जळगाव शहर महानगरपालीकेला महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री श्री.देवेंन्द्रजी फडणवीस, जल संपदा मंत्री व वैदयकीय शिक्षण मंत्री मा.ना. गिरीषभाऊ महाजन, जळगाव शहराचे आमदार राजूमामा भोळे यांनी म.सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभीयान योजने अंतर्गत 100 कोटीचे अनूदान मंजूर केलेले आहे. परंतू प्रशासनाने ही रक्कम जमा व खर्चा बाजू ठिकाणी तरतूद केली नाही. तरी जमा व खर्चामधे म.सुवर्ण जयंती नगरोत्थान या लेखाशिर्षाखाली तरतूद करण्यात यावी.

2) अर्थ संकल्पीय खर्च बाजू –

1) सार्वजनीक उदयाने व्यवस्था व दुरुस्तीसाठी प्रशासनाने 1.00 लक्ष रु. ची तरतूद केलेली असून ती अपूर्ण आहे असे वाटते. जळगाव शहरात जुने डॉ.शामाप्रसाद मूखर्जी उदयान, पारीकपार्क उदयान, हेमू कलाणी बगीचा असे जूने बगीचे अनेक आहेत. त्यासाठी 5.00 कोटी रु. ची तरतूद करण्यात यावी.

2) बालगंधर्व खुले नाटयगृहाच्या दुरुस्तीसाठी प्रशासनाने 0.0 तरतूद केलेली आहे. जळगाव शहरात बरेच नाटयप्रेमी कलावंत आहेत. त्या ठिकाणी नाटयप्रयोग, सामाजीक, धार्मीक उपक्रम सुरु असतात यासाठी नाटयगृहाच्या व्यवस्था व दुरुस्तीसाठी 50.00 लक्षची तरतूद करण्यात यावी.

3) जळगाव शहरातील कार्यरत दवाखाने या ठिकाणी औषध व यंत्र सामुग्रीसाठी प्रशासनाने 35.00 लक्ष तरतूद केलेली आहे. शहरातील दवाखाने अदयावत करणेच्या दृष्टीने व त्या ठिकाणी सुविधा पुरविणे यासाठीची रक्कम ही फारच कमी असून ती 1.00कोटी करण्यात यावी.

4) जळगाव शहरातील सिग्नल व्यवस्था बरीच जुनी झाली आहे. जळगाव शहरातील विस्तार व वाहतूक वाढली आहे. त्यासाठी प्रशासनाने केलेली 6.6 लक्ष रु.तरतूद वाढवून 1.00 कोटी रु. ची तरतूद करण्यात यावी.

5) स्मशानभूमी व्यवस्था व दुरुस्तीसाठी प्रशासनाने केलेली 50.00 हजाराची तरतूद फारच कमी आहे. तरी जळगाव शहरातील स्मशानभूमी व्यवस्था व दुरुस्तीसाठी 1.00 कोटी तरतूद करण्यात यावी.

6) रस्ते दुरुस्ती साठी प्रत्येक प्रभाग समीतीसाठी प्रशासनाने 10.00लक्ष रु.ची तरतूद केलेली आहे ती प्रत्येक प्रभाग समीती निहाय 50.00 लक्ष करण्यात यावी.

7) गटार व्यवस्था व दुरुस्तीसाठीचा एकत्र निधी प्रशासनाने फक्त 50.00 हजाराची तरतूद केलेली आहे. ती वाढवून 1.00 कोटी करण्यात यावी तसेच प्रत्येक प्रभाग समीतीसाठीची तरतूद 2.00 लक्ष वरुन 5.00 लक्ष करण्यात यावी. बऱ्याच गावठाण भागामध्ये जुन्या गटारींची अवस्था दयनिय असल्याने दुरुस्तीची आवश्यकता आहे.

8) संडास / मूतारी व्यवस्था व दुरुस्तीसाठीचा निधी 1.00 लक्ष तरतूद केलेली आहे. बऱ्याच ठिकाणी संडाशीची दुरावस्ता असून ही दुरुस्ती करणेसाठी हा निधी वाढवून 50.00 लक्ष वाढवण्यात यावा.

9) इमारत व्यवस्था व दुरुस्ती साठीचा निधी 20.00 लक्ष वरुन 50.00 लक्ष वाढवण्यात यावा.

10) व्यापारी संकूलांसाठी दुरुस्ती साठीचा 1.50 लक्ष इतकी तरतूद केली असून बऱ्याच ठिकाणातील व्यापारी संकुले या ठिकाणी व्यापारी संकुलाच्या टेरेसची दुरुस्ती, रेलींग दुरुस्ती, ड्रेनेजच्या व्यवस्थेसाठी तसेच काही ठिकाणी कॉक्रेटींग करणे इ. व्यवस्था करणेसाठी ही तरतूद 3.00 कोटी करण्यात यावा.

11) क्रिडा व्यायाम साहीत्या साठीची तरतूद प्रशासनाने केलेली नाही ती 1.00 कोटी इतकी करण्यात यावी.

12) क्रिडास्पर्धा/महापौर चषक यासाठीची केलेली तरतूद 30.00 हजार अपूर्ण आहे. यासाठी म.शासनाने सी.एम.चषक व केंद्र व राज्य शासनाच्या खेळासाठी विविध आयोजना साठी योजना आखत असते यासाठी वाव मिळावा तसेच मनपा कर्मचाऱ्यांसाठी विविध स्पर्धा घेण्यात यावेत. यासाठी 25.00 लक्षची तरतूद करण्यात यावी.

13) अंधअपंग कल्याण निधी साठीची तरतूद 2.25 कोटीवरुन वाढवून 3.00 कोटी इतकी करण्यात यावी. तसेच या योजनेची अंमलबजावणी 100 टक्के होणेसाठी प्रशासनाने दक्षता घ्यावी.

14) महीला बालकल्याण निधीसाठीची केलेली तरतूद 3.75 कोटीवरुन वाढवून 4.00कोटी इतकी करण्यात यावी या योजनेची अंमलबजावणी 100 टक्के होणेसाठी प्रशासनाने दक्षता घ्यावी.

15) जळगाव शहरात नवीन सार्व. संडाशी व मूताऱ्या साठी प्रशासनाने 1.00 कोटी तरतूद केली आहे. जळगाव शहराचा वाढता विस्तार पाहता केलेली तरतूद अपूर्ण आहे यासाठी 3.00 कोटी तरतूद करण्यात यावी.

16) नवीन इमारतीसाठी 1.50 कोटी तरतूद ठेवण्यात आलेली होती. जळगावशहराचा विस्तार होवून उपनगरामधे दवाखाने, वार्ड ऑफीसेस, अनेक इमारती, योगा हॉल इ. नवीन इमारती बांधणेसाठी 5.00 कोटी तरतूद करण्यात यावी.

17) नवीन वाहन व्यवस्था या हेडखाली 75.00 लक्ष रु. निधीची तरतूद केली असून नवीन वाहने खरेदी कामी हा निधी 1.25 कोटी इतका वाढवण्यात यावा. (विदयुत वाहने खरेदीसाठी)

18) नवीन स्मशानभूमी साठीचा निधी 50.00 लक्ष वरुन 2.00 कोटी वाढवण्यात यावा.

19) मनपाने खरेदी केलेल्या नवीन वाहनांचा विमा काढावा लागणार असल्याने वाहन विमा खर्चाची रक्कम 23.44 लक्ष वरुन वाढवून 45.00 लक्ष रु.करण्यात यावी.

20) स्मशानभूमी साठी लाकूड व दफनविधीसाठीचे साहीत्य मोफत पुरवीणेकामी प्रशासनाने तरतूद पन्नास हजार रु. केली आहे तरी ती 1.00 कोटी रु. तरतूद करण्यात यावी. व याबाबत शासनाकडे जळगावचे मा.आमदार राजुमामा भोळे, मा.महापौर हे याबाबत लेखापरिक्षण विभाग व शासनाकडे मार्गदर्शन मागविणेबाबतचे पत्र दिले आहे. याबाबतचा पाठपुरावा सुरु आहे प्रशासनाने शासनाचे मार्गदर्शन घेवून याबाबत अमंलबजावणी करावी.

21) साफसफाई खरेदी करणे कामी प्रशासनाने तरतुद केलेली 25.00 लक्ष कमी आहे. जळगाव शहरामधे कचरा संकलन करणेसाठी डस्टबीन खरेदी करणेकामी व इतर विविध साहीत्य खरेदी करणेकामी तसेच मनपा सफाई कामगारांना लागणारे साहीत्य खरेदी करणेकामी 1.00 कोटी रु. तरतूद करण्यात यावी.

22) जळगाव शहरातील मनपाच्या मतदार यादीत नावे असलेले सर्व नागरीक यांचा अपघात विमा काढणेेसाठी 1.00 कोटी तरतूद करण्यात यावी. प्रशासनाने ही तरतूद 1.00लक्ष रु.केली आहे.

23) जळगाव शहरातील जे मालमत्ताधारक नियमित मालमत्ता कर भरत आहेत व ज्यांना 2 मुली आहेत ज्यांच्या नावाने घरपट्टी लागू आहे अशा घरपट्टी धारकांना घरपट्टी 1 टक्का रिबीट मालमत्ता करातून देण्यात
यावा. ( शासनाचे कर सोडून )

24) जळगाव शहरातून आलंपिक या खेळासाठी प्रयत्न करीत असलेले खेळाडू जे राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावर प्रतीनिधीत्व असलेल्या खेळाडूंना प्रोत्साहन म्हणून मदत करण्यासाठी अटीशर्ती ठरवून घेवून 50.00 लक्ष रु. ची तरतूद करण्यात यावी.

25) जळगाव शहर महानगरपालिकेत सरदार वल्लभभाई पटेल प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा उभारणे कामी तसेच जळगाव शहरात महापुरुषांचे पूतळे उभारणेकामी 1.00 कोटी रु. तरतूद करण्यात यावी.

3) अर्थ संकल्पीय तरतूदीसाठी प्रशासनास केलेल्या सूचना –

1) मालमत्ता कराबाबतचे सर्व्हेक्षण मार्च 2019 अखेर पूर्ण करावे सन 2015 ते 18 ही वसूली कमी असल्याने ती वाढवून 100 टक्के वसुलीसाठी प्रयत्न करावे.

2) खुला भुखंड कर वसुली वाढविणेसाठी प्रयत्न करावे ज्या ठिकाणी खुल्या भुखंडावर बांधकाम परवानगी व भोगवटा नगररचना विभागाने दिलेल्या आहेत हयासंबंधीची माहिती नगररचना विभागाने कर वसुली व खुला भूखंड विभागास लेखी कळवावी. ज्या भुखंडावर यानंतरही अशी खुला भूखंड कराची आकारणी सुरु आहे ती रद्द करुन तात्काळ घरपट्टी कराची आकारणी करणेबाबत प्रभाग समीतीने कार्यवाही करावी.

3) मनपाचे प्रसूतीगृहांची दर्जोन्नती वाढवण्यासाठी प्रयत्न करावे. ज्या मनपाच्या प्रसूतीगृहांमधे वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नाही त्याबाबत नियुक्ती नव्याने करण्यात यावी. तसेच मनपा मधे अधिकारी वर्ग विशेषता डॉक्टर्स व कर्मचारी वर्ग मानधनावर (कंत्राटी तत्वावर ) भरण्यात यावे याबाबत कार्यवाही प्रशासनाने तात्काळ सुरु करावी.

4) नवीन वृक्षगणना जीपीएस द्वारे करणेकामी केलेल्या 50.00 लक्ष तरतूदीची काटेकोर अमंलबजावणी करण्यात यावी.

वरील प्रमाणे दुरुस्ती सूचविण्यात आल्यानुसार प्रशासनाने दर्शविलेल्या खर्चामधे रु.27,75,16,000/- इतकी वाढ होत आहे. यानुसार प्रशासनाने जमा खर्चामधे दुरुस्ती करावी.

वरील प्रमाणे अंदाजपत्रकात तरतूद केलेनुसार अपेक्षीत उत्पन्न साध्य करणेसंबंधी प्रशासनाने दक्षता घ्यावी. यामुळे अपेक्षीत विकास कामे करणे शक्य होईल. तसेच सभापती या नात्याने स्थायी समितीच्या वतीने मी मा. आयुक्तांचे व प्रशासकीय अधिकाऱ्यांचे आभार व्यक्त करतो. त्यांनी स्थायी समितीस जमा व खर्चाच्या तरतूदी व आकडेवारी उपलब्ध करुन दिल्या. तसेच यात सुधारणा करणेसाठी स्थायी समितीच्या सदस्यांचे व इतर महानगरपालिका सदस्यांचे ही आभार व्यक्त करतो. ज्यांनी ह्या कामी सुधारणांसाठी शिफारशी केल्या त्या सर्वांचे आभार व्यक्त करीत आहे. स्थायी समितीने केलेल्या दुरुस्तीनुसार अंदाजपत्रक महासभेपुढे मंजुरीसाठी शिफारस करीत आहे.

श्री.राजेंद्र पाटील :- सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

श्री.नितीन लढढा :- अर्थ संकल्प सर्व सामान्य नागरीकांना दिलासा देणारा आहे. कोणतीही करवाढ दरवाढ करण्यात आलेली नसल्या कारणाने आणि एक विकासाचे धोरण डोळयासमोर ठेऊन अर्थ संकल्प तयार करण्यात आला. त्याबद्दल मनापासुन मी अभिनंदन करतो. सभापती महोदयांनी अत्यंत सुटसुटीत असा परिक्षेचा पेपर तयार करुन प्रशासनाच्या सुपुर्द करुन टाकलेला आहे. आता प्रशासनाला पेपर लवकरात लवकर सोडवुन किती अवधीमध्ये आणि किती टक्केवारीने प्रशासन पास होईल याच्या संदर्भात कार्यवाही करणे आवश्यक आहे. परंतु शेवटी अर्थसंकल्पात प्रत्येक अर्थसंकल्प सादर करणारी व्यक्तीही जळगांव शहरातील स्थानिक व्यवक्ती असते आणि त्या स्थानिक व्यक्तीला या शहराच्या गरजा आणि या शहराच्या दृष्टीकोणातुन एक आत्मीयता असते. परंतु आता पर्यंतचा जो अनुभव आहे. कुठल्याही अर्थ संकल्पाची पुर्तता ही १००% होत नाही. हे आपण मान्य करतो की त्या मध्ये काही तांत्रिक अडचणी असु शकती. परंतु १००% नाही. ९०%, ८०% पर्यंत अर्थसंकल्पात जे जे काही उदिष्ट डोळयासमोर ठेवलेले असते. मग ते वसुलीच्या अनुषंगाने असेल, उत्पन्नवाढीच्या अनुषंगाने असेल किंवा उत्पन्नवाढीच्या अनुषंगाने विकास कामांवरती दर्शविण्यात आलेल्या खर्चाच्या अनुषंगाने असेल कारण ही सर्वी Exercise जी

आहे ती प्रशासनावर अवलंबुन आहे आणि मा.आयुक्त साहेब आपण कर्तव्यदक्ष आयुक्त आहात. भारतीय प्रशासन सेवेमधुन आलेले आहात. आपल्याला अनुभव आहे. आपल्याकडुन अपेक्षा आहे की अर्थ संकल्पाची अर्थ संकल्पपुर्ती होईल या दृष्टीने आपण या संपुर्ण विषयाला गांभिर्याने घेऊन एक दिशा देण्याचा प्रयत्न करावा.

श्री.अश्विन सोनवणे :- स्थायी समिती सभापती यांनी सादर केलेले अंदाजपत्रक मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.११५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, सन २०१८-१९ चे सुधारीत अंदाजपत्रकासह सन २०१९-२० या वित्तीय वर्षाचे अंदाजपत्रकास स्थायी समितीने ठराव क्र.९० दि.२६/०२/२०१९ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे.

स्थायी समितीने सर्वकष विचार करुन तसेच आयुक्त यांनी स्थायी समिती यांच्याकडेस सादर केलेल्या जमा व खर्चाच्या गोषवारा लक्षात घेवुन अंदाजपत्रक तयार करुन त्यास मान्यता प्रदान केलेली असुन ते संयुक्तीक व योग्य असल्याने जळगांव शहर महानगरपालिकेचे सन २०१८-२०१९ चे रक्कम रु.९५७.७७,६३,३५२/- चे सुधारीत अंदाजपत्रक तसेच सन २०१९-२० चे रक्कम रु.१४५८,६०,७६,१३९/- चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच ज्या मालमत्ताधारकांना फक्त एक किंवा दोन मुली असतील त्याबाबत प्रशासनाने अटी-शर्ती तयार कराव्यात व त्यांची खात्री करुन त्यांना घरपट्टी कर भरण्यामध्ये १% रिबीट देण्यात यावे.

प्रशासनाने वरिल प्रमाणे अंदाजपत्रकात योग्य त्या दुरुस्ती करुन परिपुर्ण अर्थ संकल्पाची प्रत सर्व सन्मा.सदस्यांना वितरीत करण्याची दक्षता घ्यावी. सदर अंदाजपत्रकांच्या छपाईसाठी येणाऱ्या खर्चासही याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

तसेच खुला-भूखंडकर, महानगरपालिकेच्या मालकीच्या गाळयांची भाडे व कर वसुली व इतर विविध करांचे संकलन व वसुलीची कार्यवाही यापुढे संबंधीत प्रभाग समिती मार्फत करण्याची प्रशासनाने तजविज करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- मराठे जितेंद्र भगवानराव**
**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

येणे प्रमाणे राष्ट्रगीतानंतर सभेचे कामकाज संपन्न झाले.

**सही/-**
**(भोळे सिमा सुरेश)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**